TENDER-11KMS-...

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालीत

# डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती

शिवाजी नगर, अमरावती ४४४ ६०३

---

**डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती अंतर्गत उपकरणे व साहित्य खरेदी करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहे.**

## अटी व शर्ती

१) सदर उपकरणे व साहित्य खरेदी प्रक्रिया राबविणेकरीता पुरवठा करावयाची संपुर्ण निविदा प्रक्रिया या तंत्रनिकेतनच्या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे.

२) निविदेसंदर्भातील सुचना/शुद्धीपत्रके ई. ऑनलाईन पद्धतीने तंत्रनिकेतनच्या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

३) इच्छुक निविदाधारकांनी सदर निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी वरील वेबसाईटवर दिलेल्या सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

४) सदर निविदा १७.१२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक २६.१२.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या तंत्रनिकेतनचे कार्यालयातुन घेवून अथवा संकेतस्थळावरून डाऊनलोड करून सादर करता येईल.

५) निविदाधारकांनी प्रस्तावित केलेली उपकरणे व साहित्य खरेदीनंतर तांत्रिक तपासणीसाठी पात्र असतील. अपात्र उपकरणे व साहित्य सदर पुरवठाधारकास परत करण्यात येतील. या संपूर्ण प्रक्रियेसाठी पुरवठाधारक हा कोणत्याही परताव्यास पात्र असणार नाही.

६) डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती यांनी नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे, किंवा वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या शुद्धीपत्रकाप्रमाणे Technical Specifications असावे. हे निविदाधारकास बंधनकारक राहील, अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.

७) निविदा प्रपत्रात खाडाखोड करू नये. निविदेतील स्पेसिफिकेशन नुसारच उपकरणे व साहित्य नमुद करणे बंधनकारक आहे.

८) निविदाधारकांनी वरील प्रमाणे बाबी विहित वेळेमध्ये सादर न केल्यास त्यांची निविदा अवैध ठरविण्यात येईल.

९) निविदा कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा अटी शिथील करण्याचे अधिकार प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती यांनी राखुन ठवलेले आहेत.

१०) ज्या निविदाधारकांची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास या कार्यालयाकडून पुरवठा आदेश देण्यात येईल.

११) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास Letter of Acceptance हे निविदा मंजुर झाल्याचे कळविले पासून तीन दिवसात सादर करणे बंधनकारक आहे. सदर Acceptance दिल्यापासून एक महिन्याच्या आत सदर पुरवठा करणे अपरिहार्य आहे. अन्यथा मंजुर निविदा रद्द करण्यात येवून गुणानुक्रमे पुढील निविदेस पुरवठा आदेश दिला जाईल.

१२) उपलब्ध तरतुदीचे अधिन राहूनच साहित्यांचे पुरवठा आदेश देण्यात येतील. निविदा सुचनेतील नमुद परिमाण संख्येत वाढ/घट होण्याची शक्यता आहे.

१३) निविदाधारकाने पुरवठा आदेश दिल्यापासून विहित केलेल्या मुदतीच्या आंत निविदेतील विनिर्देशाप्रमाणे उपकरणे व साहित्य डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, शिवाजी नगर, अमरावती या कार्यालयापर्यंत स्वखर्चाने पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१४) उपरोक्त साहित्याची किमान वॉरंटी ही विहित पुरवठापत्रकात आणि तत्सम दस्तऐवजांमध्ये नमुद केल्याप्रमाणे तंतोतंत असावी.

१५) साहित्याचा पुरवठा केल्यानंतर निविदाधारकाने प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, शिवाजी नगर, अमरावती यांचेकडे कार्यालयीन पोहोच पावतीसह देयक सादर करणे आवश्यक आहे. देयकानुसार ८० टक्के रक्कम धनादेश/आरटीजीएस द्वारे पुरवठाधारकास, पुरवठा केलेल्या साहित्याची तपासणी करून, Installation आणि Commissioning यशस्वीरित्या केल्यानंतर अदा करण्यात येईल. उर्वरीत २० टक्के रक्कम सदर साहित्याची यशस्वी चाचणी किंवा ३ महिने कालावधी यापैकी जे नंतर असेल तेव्हा निविदाधारकास अदा करण्यात येतील.

१६) विहित व परस्पर संमती लेखी स्वरूपात दर्शविलेल्या मुदतीत न पुरवठा केल्यास विहित नियमानुसार निविदा रद्द समजण्यात येवून गुणानुक्रमे पुढील निविदाधारकास संधी देण्यात येईल.

१७) कोणतीही सशर्त निविदा स्विकारली जणार नाही/विचारात घेतली जाणार नाही.

१८) निविदाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निविदेच्या सर्व कागदपत्रांवर सिल, स्वाक्षरी करून सर्व कागदपत्रे स्वाक्षांकीत करून सादर करणे आवश्यक आहे.

१९) निविदेतील मंजुर दरांची वैधता ३ महिन्यापर्यंत ग्राह्य राहील. त्यानुसार यापुढे उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार पुरवठा आदेश देण्यात येतील. यशस्वी पुरवठाधारकास त्या दराने पुरवठा करणे बंधनकारक असून मंजुर दरास कोणतीही भाववाढ देण्यात येणार नाही.

२०) निविदेबाबत कोणतीही शंका/प्रश्न असल्यास निविदा भरण्याच्या तारखेच्या किमान ३ दिवस अगोदर लेखी स्वरूपात विचारल्यास शंका निरसन करण्यात येईल.

२१) निविदाधारकांनी साहित्याचे दर नमुद करतांना सर्व करांसहित नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच शासनाने वेळोवेळी आदेशित केलेले कर देयकातुन कपात करण्यात येतील.

२२) या संबंधातील सर्व अधिकार प्राचार्य, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती यांचेकडे राखीव असून वर नमुद अटी व शर्ती यात बदल करण्याचे सर्वाधिकार सुरक्षित.

मला वर नमुद सर्व अटी व शर्ती मान्य आहेत, आणि मी त्यांना बांधील राहील.

दिनांक : ....................

ठिकाण : ....................

सील

स्वाक्षरी : ..........................................................

पुरवठाधारकाचे नाव : ..............................................

प्रतिष्ठानाचे नाव : ...................................................

संपूर्ण पत्ता : .........................................................

...............................................................................

अधिकृत प्रतिनिधीचे नाव :.........................................

मो. क्र. : ...............................................................

जी.एस.टी. क्र.: ......................................................

ईमेल/वेबसाईट : ....................................................

**हर्षवर्धन प्र. देशमुख**
अध्यक्ष
श्री शिवाजी शिक्षण संस्था
अमरावती

**दिलीप भ. इंगोले**
अध्यक्ष, खरेदी समिती
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन,
अमरावती

**प्रमोद व. देशमुख**
प्राचार्य
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन,
अमरावती